**ठळक बातम्या**

- संपूर्ण जग हरित भविष्याकडे वाटचाल करत असून भारत या स्थित्यंतरात सक्रियपणे योगदान देत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, वडोदरा-मुंबई एक्सप्रेस वे च्या दोन टप्प्यांसह विविध प्रकल्पांचा केला प्रारंभ
- रिझर्व बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढाव्यात रेपोदरात बदल नाही, आर्थिक वृद्धीदर घटण्याचा अंदाज
- जानेवारी ते मार्चपर्यंत जीडीपी वाढ ७ पूर्णांक ७ दशांश टक्के
- सुखोई एसयू ५७ विमानाच्या संयुक्त उत्पादनाचा रशियाचा भारताला प्रस्ताव

**आणि**

- १८ वर्षांखालच्या मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात भारताची पाकिस्तानवर मात, विजेतेपदासाठी उद्या जपानशी लढत

**<><><><><><>**

संपूर्ण जग हळूहळू हरित भविष्याकडे वाटचाल करत असून भारत या स्थित्यंतरात सक्रियपणे योगदान देत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ते आज गुजरातमध्ये सुरत इथं महाराष्ट्र आणि गुजरातला अधिक वेगवान आणि सक्षम वाहतूक जाळ्यानं जोडणाऱ्या प्रकल्पासह विविध महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी करताना बोलत होते. गावं आणि शहरांचा एकाच वेळी विकास झाला तर विकसित भारताचं हे स्वप्न साकार होऊ शकतं, असं प्रधानमंत्री म्हणाले. जगातल्या उर्जासंकटातही भारतानं आत्मनिर्भरतेमुळे मात केल्याचं ते म्हणाले...

**होल्ड.. बाईट- प्रधानमंत्री**

यावेळी प्रधानमंत्र्यांनी सुरतमध्ये रस्ते, ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रांशी संबंधित १८ हजार ८०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या, विविध विकासकामांचं उद्घाटन आणि लोकार्पण केलं. तसंच त्यांनी वडोदरा-मुंबई एक्सप्रेस वे च्या सहाव्या आणि सातव्या टप्प्याचं राष्ट्रार्पण केलं. या प्रकल्पामुळे गुजरात आणि महाराष्ट्रादरम्यान अतिजलद वाहतूक, लॉजिस्टिक कार्यक्षमता आणि आर्थिक दळणवळणाला मोठी चालना मिळेल.

**<><><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीनंतर आज जाहीर केला. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. त्याचवेळी आर्थिक वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन घटवून ६ पूर्णांक ६ दशांश टक्के केला आहे. जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, कमी मान्सून यामुळं वृद्धी दर कमी होण्याची शक्यता रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वर्तवली. ते मुंबईत द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर वार्ताहर परिषदेत बोलत होते. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनफुगवट्याचा दर चालू आर्थिक वर्षात ५ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलंय. इंधनाच्या वाढलेल्या किंमती, इतर वस्तूंच्या दरात झालेली वाढ यामुळं चलनवाढीचा दर वाढलेला असेल, असं मल्होत्रा म्हणाले. जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असताना भारत समर्थपणे आर्थिक अडचणींना तोंड देत असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात चलनी नोटांकरता प्लॅस्टिकचा वापर करण्याचा विचार अगदी प्राथमिक पातळीवर असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. बाजारात चलनी नोटांच्या उपलब्धतेवर रिझर्व बँकेचं लक्ष असून आवश्यक असेल तेव्हा नोटा उपलब्ध करुन दिल्या जातील असं त्यांनी स्पष्ट केलं.

**- - - होल्ड - बाईट- मल्होत्रा - - -**

<><><><><><>

देशाच्या अर्थव्यवस्थेत २०२५-२६ मध्ये जानेवारी ते मार्चपर्यंत जीडीपी ७ पूर्णांक ७ दशांश टक्क्यानं वाढल्याचा अंदाज सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज प्रसिद्ध केलेल्या तात्पुरत्या अंदाज पत्रकात म्हटले आहे. यापूर्वी २०२४-२५ मध्ये वार्षिक जीडीपी दोन लाख ९९ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त होता तर २०२५-२६ मध्ये वास्तविक जीडीपी तीन लाख २३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज वर्तवला आहे.

प्रमुखत: कृषी आणि मत्स्यपालन क्षेत्रांच्या कामगिरीमुळे प्राथमिक क्षेत्रात ३ पूर्णांक २ दशांश टक्के वाढीचा दर दिसून आला. तसंच कारखानदारी, व्यापार,हॉटेल, वाहतूक,दळणवळण आणि प्रसारणाशी संबधित सेवा आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रांमध्ये गेल्या आर्थिक वर्षात वाढ झाली आहे. त्यामुळं २०२५-२६ च्या चौथ्या तिमाहीत, वास्तविक जीडीपी ७ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे.

हे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या अंतर्निहित क्षमतेचं, सुधारणांच्या यशाचं तसंच १४० कोटी भारतीय नागरिकांच्या कठोर परिश्रमांचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><><>

आसामच्या मंत्रिमंडळात नव्यानं समाविष्ट केलेल्या १२ मंत्र्यांचा शपथविधी आज गुवाहाटी इथं झाला. राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी या नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आसामच्या  मंत्र्यांची संख्या आता १७ वर पोचली असून संविधानातल्या तरतुदीनुसार आसामच्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त १९ सदस्य असू शकतात.

<><><><><><>

रशियाच्या स्टेल्थ प्रकाराच्या

सुखोई एसयू ५७ या विमानाच्या संयुक्त उत्पादनाचा प्रस्ताव रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारताला दिला आहे. सेंट पीटर्सबर्ग इकोनॉमिक फोरमच्या निमित्ताने ते बातमीदारांशी बोलत होते. दोन्ही देशातली सामरिक भागीदारी मजबूत करण्यासाठी एकात्मिक हवाई संरक्षण प्रणाली आणि संबंधित तंत्रज्ञानासह इतर महत्त्वाच्या सुरक्षा घटकांसंदर्भात भारताबरोबर सहकार्य करण्याची इच्छा आहे, असंही पुतीन यावेळी म्हणाले.

<><><><><>

जपानमध्ये सुरु असलेल्या १८ वर्षांखालच्या मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत भारतीय संघाने पाकिस्तानचा ५-३ असा पराभव केला. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची गाठ यजमान जपानच्या संघाशी पडेल. पहिल्या उपांत्य फेरीत जपानकडून पराभव झालेला मलेशिया तिसऱ्या स्थानासाठी पाकिस्तानशी लढत देईल.

मुलींच्या १८ वर्षांखालच्या आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघ उपांत्य फेरीत चीनकडून पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत झाला.

<><><><><>

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटात भारताच्या हरिहरन अंशकरुणन आणि एम आर अर्जुन या जोडीने उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत त्यांच्यापेक्षा वरचढ असलेली मलेशियन जोडी आरोन ताई आणि कांग खाई झिंग, यांना काल त्यांनी चकित केलं. हरिहरन आणि अर्जुन ने १६- २१, २१-१५, २१-१९ असा विजय मिळवला. या स्पर्धेत बाकी भारतीय खेळाडूंचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज आणखी पुढं सरकला असून अरबी समुद्राचा पूर्व मध्य भाग आणि पश्चिम मध्य भाग तसंच गोवा आणि कर्नाटकच्या काही भागात पोहोचला आहे. गोवा आणि कर्नाटकचा उर्वरित भाग, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशात मोसमी पाऊस पोहोचण्यासाठी स्थिती अनुकूल असल्याचं हवामानविभागाने म्हटलं आहे. तमिळनाडू आणि बंगालच्या उपसागराचा नैर्ऋत्य भाग इथंही अशीच स्थिती पुढचे दोन दिवस राहील.

<><><><><>

अंदमान बेटांपासून १५ किलोमीटर अंतरावर श्री विजयपूरम ३ इथं नैसर्गिक वायूचे साठे सापडल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप पुरी यांनी दिली आहे. ऑइल इंडियाकडून हे उत्खनन सुरू असून या वायूची तपासणी सुरू आहे. अंदमानच्या समुद्रात पेट्रोलियम पदार्थांचा साठा उपलब्ध असल्याचं यामुळं स्पष्ट झाल्याचं पुरी म्हणाले.

<><><><><>

नाशिकमधे साधुग्राम प्रकल्पाकरता १९१ एकर २१ गुंठे जमिनीच्या संपादनासाठी २ हजार २६७ कोटी रुपये खर्चाला राज्यशासनानं मान्यता दिली आहे. नगरविकास विभागानं आज हा शासन निर्णय जारी केला. हा निधी अन्यत्र वळवता येणार नाही, वळवला गेल्यास संबंधितावर कठोर कारवाई केली जाईल असं या जीआरमधे म्हटलं आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यात साधुग्राम उभारण्यासाठी ३७७ एकर जमीन राखून ठेवली असून त्यातली सुमारे ९४ एकर आतापर्यंत संपादित झाली आहे. जमिनीच्या मालकांना आरटीजीएस द्वारे तात्काळ मोबदला चुकता करावा असे निर्देश नाशिकचे जिल्हाधिकारी आणि आयुक्तांना दिले आहेत.

//<><><><><>//